प्रधान कार्यालय, लोकमंगल
1501, शिवाजीनगर, पुणे 411 005
020-25614291
cmmedia@mahabank.co.in

## प्रेस विज्ञप्ति

## बँक ऑफ महाराष्ट्र कडून महामोबाइल ॲप द्वारा मुदत ठेव तारणावर ओव्हरड्राफ्ट सुविधा

**पुणे, 17 जुलाई, 2020** : सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य आणि आपल्या मैत्रीपूर्ण ग्राहकसेवेसाठी परिचित असणा-या बँक ऑफ महाराष्ट्र ने महामोबाइल ॲप द्वारा मुदत ठेवींवर ओव्हरड्राफ्ट सुविधा सुरु केली आहे. व्यक्तिगत बचत खाते असणा-या ग्राहकांना याचा लाभ घेता येईल. मुदत ठेव रकमेच्या 90% पर्यंत ओव्हरड्राफ्ट मिळेल व त्यावर मुदत ठेवीवरील व्याजापेक्षा अधिक 2% व्याजदर आकारला जाईल.

बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या ग्राहकांना सध्याच्या महासाथीत आधार देण्यासाठी मुदत ठेवींवर ओव्हरड्राफ्ट सुविधा सुरू केली आहे. बँक ऑफ महाराष्ट्रच्या महामोबाइल ॲपचा वापर करुन ग्राहकांना आपल्या घरी बसून केवळ तीन कृतींमध्ये या सुविधेचा लाभ घेता येईल.

ग्राहकांना मुदत ठेवीच्या रकमेच्या 90% पर्यंत ओव्हरड्राफ्ट मिळू शकेल. त्यामुळे मुदत ठेव बंद करावी लागणार नाही. मुदत ठेवीवर ग्राहकांना लागू दराने व्याज मिळत राहील आणि ओव्हरड्राफ्टची परतफेड एक रकमी सुद्धा करता येईल. त्यामुळे त्यांच्यावर मासिक हप्त्याचा बोजा येणार नाही. या सुविधेसाठी बँके कोणतेही प्रक्रिया शुल्क आकारणार नाही व या सुविधे साठी कोणतीही इतर कागदपत्रे न मागण्याचा निर्णय बँकेने घेतला आहे.